**प्रेसनोट** दिनांक –२१/०१/२०२२

**लोकसेवक श्री.हिम्मत वसंत सापळे वय ३८ वर्षे, वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र कार्यालय वाडा (वर्ग–२) यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे (कॅम्प पालघर) यांनी घेतले ताब्यात**

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे (कॅम्प पालघर) |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | वाडा पोलीस ठाणे, जिल्हा पालघर गु.र.नं. १८/२०२२ |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **लोकसेवक श्री.हिम्मत वसंत सापळे वय ३८ वर्षे, वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र कार्यालय वाडा (वर्ग–२)** |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ६०,०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,०००/– रूपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे सुमारे २५ वर्षापासून लॅन्ड कन्सलटन्सीचा व्यवसाय करतात. तक्रारदार यांच्या मालकीची मौजे आलमान, ता. वाडा, जि. पालघर येथील गट नं. ३ व ४ अशी शेतजमीन आहे. सदरच्या जमीनीस वन कायदयाच्या तरतुदी लागू होत नसल्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळणेकामी सन २०१७ मध्ये उप वन संरक्षक कार्यालय, जव्हार येथे अर्ज केलेला होता. त्यामुळे तक्रारदार हे दिनांक २०/०१/२०२२ रोजी वनपरीक्षेत्र अधिकारी, पश्चिम वाडा, जि.पालघर यांचे कार्यालयात जावून वनपरीक्षेत्र अधिकारी, श्री.सापळे यांना भेटले त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांच्या अर्जाच्या अनुषंगाने तपासणी करून त्याचा अहवाल उप वनसंरक्षक कार्यालय, जव्हार यांचेकडे सादर करण्यासाठी ६०,०००/– रू.लाचेची मागणी केली होती. त्यामुळे तक्रारदार यांनी दिनांक २१/०१/२०२२ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे (कॅम्प पालघर) कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.२१/०१/२०२२ रोजी तक्रारदार यांना आरोपी लोकसेवक यांचे कार्यालयात पंचासह पाठवून पडताळणी केली असता, आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामाचे अनुषंगाने ६०,०००/–रू.लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५०,०००/– लाचेची रक्कम दिनांक २१/०१/२०२२ रोजी दुपारी १२:३६ वाजताच्या सुमारास तक्रारदार यांच्या कार्यालयात स्विकारली असता नमूद आलोसे यांना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, (कॅम्प पालघर) कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे (कॅम्प पालघर) यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे (कॅम्प पालघर) पालघर प. ४०१ ४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– —
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क्र. :– 9923346810

(नवनाथ जगताप)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
ठाणे (कॅम्प पालघर)